**जबाब** **दि ३१/०७/२०२४**

मी सौ.अनिता मनोज भट, वय ४५ वर्षे, व्यवसाय– हॉस्पीटल एच.आर. रा. ए १,१३०६,व्हरटेक्स सॉलीटेक, रिलायन्स मार्ट, कल्याण प. जि.ठाणे मो.क्र.९९२००३४८१४ समक्ष पोलीस ठाण्यात येवुन जबाब लिहून देते की,

मी वरील नमुद पत्त्यावर ७ वर्षोपासुन रहावयास आहे. माझे सोबत माझे पती नामे श्री मनोज चिंतामणी भट वय ४६ वर्षे, सासु नामे द्रोपदी चितामणी भट वय ७२ वर्षे,मुलगी नामे ताज भट वय ११ वर्षे, मुलगा नामे तनुष भट वय १ वर्षे, मुलगी नामे तानीआ भट वय १ वर्षे, असे आम्ही राहतो. माझे पती हे खाजगी नोकरी करित असून मी श्रीदेवी हॉस्पीटल कल्याण प येथे एच आर म्हाणुन काम करते त्यातुन मिळणाऱ्या पगारावर आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक २७/०५/२०२४ रोजी दुपारी ०२:०० वा सु श्रीदेवी हॉस्पिटल येथे मी कामावर असताना एक महीला नामे सचिता तुषार कफाले वय २३ वर्षे,रा. गोदावरी चाळ नं.१, ६,म्हारळ शहाड, गावदेवी मंदीर जवळ, कल्याण शहाड. ही महीला डीलेवरी साठी ॲडमीट झाली होती. नंतर सचिता कफाले ही सध्याकाळी ०५:४५ वा डिलेवरी झाली. त्यात त्यानी एक मुलीला जन्म दिला. नंतर त्याना हॉस्पिटलचे डॉक्टर अशोक दुबे यानी सांगीतले की तुम्हाला मुलगी झाली आहे. तेथे असलेले डॉक्टर अंजुम सय्यद, डॉक्टर फलेवीया ठाकुर असे उपलब्ध होते. तेव्हा लहान बाळाला एक छोटीसी ॲबनोरमॅलीटी आहे ते आपण टेस्ट करूण समजेल काय त्रास आहे किवा नाही. त्यानी डॉक्टर घाणेकर बैलबाजार येथे दाखवण्यस सांगितले परतु तेथे डॉक्टरांना दाखवले नाही व कोणतीही ब्लड टेस्ट केली नाही. दिनांक २९/०५/२०२४ रोजी त्याना नॉर्मल डिलेवरी असल्याने श्रीदेवी हॉस्पिटल मधुन डिक्चार्ज देण्यात आला. नंतर ०३/०६/२०२४ रोजी परत श्रीदेवी हॉस्पिटल येथे चेकअपसाठी आई सचिता व बाळाला घेवुन बाळाचे वडील तुषार तानाजी कफाले हे घेवुन आले होते. तेव्हा तुषार कफाले यानी मला विचारले की बाळाचे जन्म दाखल्यावर कोणाचे नाव असेल तेव्हा मी तुम्हा आईवडीलांचे नाव असे मी सांगितल्या नंतर त्यांनी मला सांगितले की बाळ हे ट्रान्सजेन्डर असुन त्याला आम्ही किन्नर लोकाकडे देणार आहोत असे सांगु लागले. तेव्हा मी त्यास समजावुन सांगितले की बाळ मुलगी आहे गैरसमज करून घेवु नका असे सांगुन त्यावेळी बाळाला डॉक्टर अशोक दुबे यांनी चेक केले असता डॉक्टर दुबे यानी त्याना सागितले की श्रीलिंगी बाळाच्या योनीमधुन किंचीत रक्त येत आहे तुम्ही कोणताही मनात विचार न आणता डॉक्टर घाणेकर बैलबाजार कल्याण यांना दाखवुन परत येण्यास सांगितले. परतु तो परत आला नाही.

मी घरी गेल्यानंतर माझे पती नामे मनोज चितांमणी भट यांचेशी चर्चा केल्यानंतर घटनेचे गाभिर्य ओळखुन सदर बाळास आपण दत्तक घेवु याहेतुने दि ०४/०६/२०२४ रोजी मी स्वत: तुषार कफाले याला त्याचा मोबाईल क्रमाक. ९५०३९६२८२८ या नंबरवर सपर्क साधुन बाळाबद्दल विचारून त्यास श्रीदेवी हॉस्पिटल येथे बोलविले परंतु त्याने मी बाळाबद्दल ची व्यसस्था केलेली आहे, व मी सध्या गावाला आहे मी दोन महीणे येवु शकत नाही असे सांगितले. त्यानतर दि.०३/०६/२०२४ रोजी हॉस्पिटल मध्ये तुषार व्दारली गाव ता अबंरनाथ येथील किन्नर बाबत बोलला होता म्हणुन आम्ही दि १५/०६/२०२४ रोजी किन्नर यांची माहीती काढुन व्दारली येथे गेलो परंतु तेथे समजले की बाळ निता केणे रा. विठ्ठलवाडी स्टेशन समोर कल्याण पु. मो नं ९१६७९४७७७१ येथे असल्याचे समजले परंतु तेथे गेल्यानंतर निता केणे यांनी बाळ ट्रान्सजेन्डरच आहे. व त्याला आम्ही देणार नाही असे सांगितले. आम्ही तेथुन परत आलो. व तुषार कफाले यास फोन करून माझे पतीने समजावले की ते बाळ ट्रान्सजेन्डर नाही त्याला घेवुन ये त्याला पाहीजे ते दवाउपचार मी करतो परंतु तुषार यांने माझे पतीला सांगितले की मी बाळ किन्नरानकडे दिला आहे. ते मी परत घेणार नाही असे सांगितले. तुषार यास म्हारळ येथील ग्रामस्थांमार्फत सुध्दा समजवण्याचा प्रयत्न केला परंतु तो ऐकण्यास तयार नाही. सदर घटनेबाबत मी दि १३/०७/२०२४ रोजी ऑनलाईन तक्रार केली आहे. तुषार कफाले व त्याची पत्नी सचिता कफाले यांनी त्याना दि २७/०५/२०२४ रोजी श्रीदेवी हॉस्पिटल येथे त्यांना जन्मास आलेले स्त्रिलींगी बाळ हे ट्रान्सजेन्डरच आहे असा गैरसमज करून घेवुन त्याचा परीत्याग

करण्याच्या हेतुने त्याचा सांभाळ–देखभाल करण्यास टाळण्यासाठी बाळास शारीरीक मानसीक कष्ट होतील अशा रितीने बाळाला किन्नरांकडे देवुन बाळाचा परीत्याग केला.म्हाणुन माझी त्याचेविरूध्द तक्रार आहे.

तरी दिनांक ३/०६/२०२४ रोजी नक्की वेळ माहीत नाही. श्रीदेवी हॉस्पिटल येथे नवजात बालकास चेकपसाठी आणणारे इसम नामे तुषार तानाजी कफाले वय २४ वर्षे, धंदा–माझगाव डॉकयार्ड मुबंई येथे नोकरी, रा. गोदावरी चाळ नं.१, ६,म्हारळ शहाड, गावदेवी मंदीर जवळ, कल्याण शहाड. व त्याची पत्नी सचिता तुषार कफाले वय २३ वर्षे, यानी दिंनाक २७/०५/२०२४ रोजी सध्याकाळी०५:४५ वा जन्माला आलेली मुलगी वय ८ दिवस ही ट्रान्सजेन्डर आहे असा गैरसमज करून घेवुन तीचा परीत्याग करण्याच्या हेतुने त्याचा सांभाळ–देखभाल करण्यास टाळण्यासाठी बाळास शारीरीक मानसीक कष्ट होतील अशा रितीने बाळाला किन्नरांकडे देवुन बाळाचा परीत्याग केला.म्हणुन माझी त्याचे विरोधात तक्रार आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणेप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

समक्ष                                                                                    हे लिहुन दिले, सही

पोलीस ठाणे अंमलदार
महात्मा फुले चौक पोलीस ठाणे कल्याण प.